# Shri Siddheshwar Women's Polytechnic, Solapur

**शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्कच्या 50 टक्के ऐवजी 100 टक्के लाभ**

शासन नियमानुसार शैक्षणिक वर्ष 2024 – 2025 पासुन तंत्रनिकेतन मध्ये प्रवेश घेणाऱ्या व शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थीनींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या 50 टक्के लाभा ऐवजी 100 टक्के लाभ देण्यास मान्यता मिळाली आहे. त्या संबंधीत अटी व नियम खालील प्रमाणे

01 तंत्रनिकेतन मध्ये केंद्रिभूत प्रवेश प्रकियेव्दारे (Centralized Admission Process CAP) प्रवेश घेणे बंधनकारक आहे.

02 व्यवस्थापन व संस्थास्तरावरील प्रवेश (Management & Institute Level ) प्रकियेव्दारे प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थीनीना या सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

03 मुलीच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रू. 8 लाख किंवा त्यापेक्षा कमी असणे अनिर्वाय आहे

04 ही सवलत व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (EWS), इतर मागास प्रवर्गातील (OBC), आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास प्रवर्गातील (SEBC) विद्यार्थीनीन करीता आहे.

05 हा लाभ नविन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित (द्वितीय आणि तृतीय वर्षात) असलेल्या अर्जाचे नूतनीकरण केलेल्या मुलींना घेता येणार आहे.

06 विद्यार्थीनींना फक्त महाविद्यालंयाची (Development Fee) व इतर फी भरणे आवश्यक आहे.

07 सदर योजनेचा लाभ घेण्याकरीता विद्यार्थीनींनी शिष्यवृत्ती फॉर्म भरणे आवश्यक असून फॉर्म दिलेल्या वेळेत भरण्याची सर्वस्वी जबाबदारी ही विद्यार्थीनींची असेल अन्यथा विद्यार्थीनी या योजनेपासून वंचित राहतील.

08 ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय करतांना, ईडब्ल्यूएस प्रमाणपत्रा ऐवजी आई व वडील (दोन्ही पालकांचे) एकत्रित उत्पन्नावर आधारीत सक्षम प्राधिकारी यांनी दिलेले उत्पन्न प्रमाणपत्र अनुज्ञेय करण्यात येत आहे तथापि, जे विद्यार्थी नोकरीत असतील, त्यांच्या आई–वडील यांच्या उत्पन्नासोबत विद्यार्थ्यांचे उत्पन्न, उत्पन्न प्रमाणपत्रासाठी विचार करण्यात येणार आहे.

09 ईडब्ल्यूएस आरक्षणातून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेचा लाभ प्रथम वर्षाकरीता मिळाल्यानंतर ही सवलत त्याचा अभासक्रम पूर्ण होईपर्यंत अनुज्ञेय राहील अशा विद्यार्थ्यांना दुसऱ्या वर्षापासुन दरवर्षी उत्पन्न प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता राहणार नाही.

10 आधिक माहितीसाठी ऑफीस मध्ये संपर्क साधावा.

Shri Siddheshwar Women's Polytechnic, Solapur. *

(Gajanan R. Dharane)
Principal
Shri Siddheshwar Women's
Polytechnic, Solapur.

All Notice Boards